पशुसल्ला

# विषबाधेपासून पाळीव जनावरांचे संरक्षण




**प्रा. प्रणिता सहाणे**
(मो.नं. ८६००३०१३२९)
कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालय, गुंजाळवाडी पठार, संगमनेर, जि. अहमदनगर


विष किंवा विषारी पदार्थांचा जनावराच्या शरीरात प्रवेश होणे म्हणजेच विषबाधा होणे होय. विषबाधेचे शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात किंवा मृत्यू देखील ओढवू शकतो. त्यामुळे जनावरांना विषबाधेपासून वाचवले पाहिजे.

जनावरांमध्ये विषबाधेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. यामध्ये प्रामुख्याने सायनाईडची विषबाधा, ऑक्झॅलिकची विषबाधा आणि सरकीतून होणारी विषबाधा यांचे प्रमाण जास्त आढळते. विषबाधा टाळण्यासाठी पशुपालकाकडे नेमकी माहिती असणे गरजेचे आहे. अशी माहिती पशुपालकाकडे असल्यास विषबाधा कोणत्या कारणाने होते हे समजेल व विषबाधा होऊ नये यासाठी प्रयत्न केले जातील.

## १) सायनाईडची विषबाधा

**कारणे :** संकरित ज्वारीचे नवीन ठोंब किंवा ज्वारी कापल्यानंतर येणारे फुटवे यामध्ये हायड्रोसायनिक आम्ल या विषारी द्रव्याचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे सायनाईडची विषबाधा संभवते.

**लक्षणे :** १) हे आम्ल जनावराच्या पोटात गेल्यास थोड्याच अवधीत जनावरे अस्वस्थ होतात व त्यांच्या श्वासोच्छ्‌वासात अडथळा निर्माण होतो. २) डोळे विस्फारून व फेफरे येऊन जनावरे मरण पावतात. डोळे शेंदरी रंगासारखे होणे हे या विषबाधेचे लक्षण आहे.

**उपाय :** १) ज्वारीचे फुटवे असलेल्या शेतात जनावरांना चरण्यास सोडू नये. २) विषबाधा झालेल्या जनावरांस तत्काळ पशुवैद्यकीय अधिकाऱ्याची मदत घेऊन उपचार करावे.

## २) ऑक्झॅलिकची विषबाधा:

**कारणे :** १) काळा बुरशीयुक्त कडबा जनावराच्या खाण्यात आल्यास ही विषबाधा होते. २) रब्बी गहू-हरभरा पिकांत वाढणारे ढोरकाकडा नावाचे तण जनावरांनी खाल्ल्यासही ही शक्यता असते.

**लक्षणे :** १) रक्तात कॅल्शियमची कमतरता निर्माण होते. त्यामुळे अडखळत चालणे, कुंथणे, पोटफुगी, लघवी थेंबाथेंबाने होणे किंवा अजिबात न होणे अशी लक्षणे दिसतात. २) गुद्द्वारापासून ते मागील दोन पायांतून अंडकोषापर्यंत सूज येते.

**उपाय :** १) बुरशीयुक्त कडबा अथवा गहू-हरभऱ्यातील उपटून टाकलेले तण जनावरांना खाण्यास देऊ नये.

२) एक किलो कळीचा चुना १० लिटर पाण्यात काही वेळ ठेवून तयार झालेली चुन्याची निवळी (१ लिटर दर आठ तासांनी) पाजल्यास ही विषबाधा कमी होते.

३) विषबाधेचे प्रमाण कमी करण्यासाठी कॅल्शियमचे इंजेक्शन पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने द्यावे.

## ३. सरकीतून होणारी विषबाधा

**कारणे :** १) दुधाळ जनावरांना अथवा बैलांना सरकी घालण्यात येते. कीटक प्रतिबंधक व अधिक उत्पादन देणाऱ्या कपाशीच्या सरकीमध्ये गॉसिपॉल या विषारी द्रव्याचे प्रमाण अधिक असते. २) गॉसिपॉलयुक्त सरकी जनावरांच्या सतत खाण्यात आल्यास दीर्घकालीन विषबाधा होण्याची शक्यता असते.

**उपाय :** १) सरकी जनावरांना सतत देऊ नये. २) चार आठवडे सतत हे खाद्य दिल्यास नंतर एखादा आठवडा खाद्य देऊ नये.

(**टीप :** पशुपालकाने जनावरांना विषबाधा झाल्यावर पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने उपचार करून घ्यावे.)